


समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 237 | शुक्रवार दि. 12 सप्टेंबर 2025 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## स्थानिकच्या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली असतानाच

### केंद्रीय निवडणूक आयोग मोठा निर्णय;राजकीय पक्षांची धडधड वाढली



महाराष्ट्रात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींनी वेग पकडला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये इनकमिंग आणि आऊटगोईंगला उधाण आलं आहे. एकीकडे स्थानिकच्या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरु केली असतानाच आता केंद्रीय निवडणूक आयोग (Election Commission) मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक आयोगाकडून मतदारयाद्यांच्या सखोल तपासणी सुरु आहे. आता केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. निवडणूक आयोग बिहारप्रमाणेच महाराष्ट्रातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी (Local Body Elections) मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याच्या तयारीत असल्याची मोठी अपडेट समोर येत आहे. महाराष्ट्रात दिवाळीनंतर कधीही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. या निवडणुकांसाठी महायुती आणि महाविकास आघाडी अशा सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठी खलबतं सुरु आहे.विधानसभेचा स्ट्राईक रेट कायम ठेवण्याचं आव्हान महायुतीसमोर तर महाविकास आघाडीला अपयशाचा ठपका पुसत पुन्हा एकदा स्थानिकच्या निवडणुकांमध्ये जोरदार मुसंडी मारण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावावी लागणार आहे. त्याचमुळे राज्यातील सर्वच पक्षांनी स्थानिकसाठी आत्तापासूनच जोरदार तयारी केल्याचं दिसून येत आहे.या निवडणुकांसाठी प्रत्येक पक्षानं स्थानिक पातळीवर युती,आघाडी किंवा स्वबळाबाबतच्या पान 3 वर

## हैद्राबाद गॅझेटवरून ओबीसींचा संताप उसळला?

### मुंबईकडे कूच करण्याची तयारी, दसऱ्यानंतरचा मुहूर्तही ठरला



राज्यातील महायुती सरकराने मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतला. हैद्राबाद गॅझेट लागू करणारा शासन निर्णय काढला. ज्यात आधी पात्र असा शब्द होता. मात्र त्यानंतर तो शब्दच काढून टाकण्यात आला. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. यावरूनच आता ओबीसी समाज आक्रमक झाला असून याला विरोध करण्यासह हैद्राबाद गॅझेटच्या रद्दच्या मागणीसाठी मुंबईकडे कूच केली जाणार आहे. मुंबईत लवकरच महामोर्चा काढण्यात येणार आहे. यासाठी दसऱ्यानंतरचा मुहूर्त ठरवण्यात आला असून हालचालींना वेगही आला आहे.मराठा समाजाच्या आरक्षणाच्या पान 3 वर

## आज ठळक

### पहलगाममध्ये महिलांचं कुंकू पुसल्या गेलं, भाजप विसरला का? संजय राऊतांचा हल्लाबोल



एकीकडे पहलगाम हल्ल्यावरून देशात पाकिस्तानविरोधात क्षोभ असतानाच दुसरीकडे अबुधाबीमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये सामना होत आहे. 14 सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमिरातमध्ये आशिया कप 2025 मध्ये दोन्ही संघ आमने-सामने येतील. हा सामना रद्द करण्याची देशभरात मागणी होत आहे. तर आज खासदार संजय राऊत यांनी यावरून भाजपवर बोचरी टीका केली आहे. पहलगाममध्ये महिलांचं कुंकू पुसल्या गेलं, भाजप विसरला का? असा खडा सवाल त्यांनी भाजपला विचारला. त्याचवेळी येत्या रविवारी उद्धव सेना सरकारच्या भूमिकेविरोधात आंदोलन करणार असल्याची माहिती दिलीपहलगाम हल्ल्यात 26 निरपराध भारतीय मारल्या गेले. त्यांच्या कुटुंबियांचा आक्रोश संपलेला नाही. या हल्ल्यातील दहशतवादी अजूनही सापडलेले नाहीत. ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरु असल्याचे सांगितले जाते. पाकिस्तानच्या कारवाया कश्मिरमध्ये थांबलेल्या नाही. पाकिस्तानचे कंबरडे मोडण्याचे वक्तव्य सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंग आणि भाजपच्या बड्या नेत्यांनी वारंवार मांडला. पाकिस्तानबरोबर कोणतेही संबंध ठेवणार नसल्याचे ते म्हणाले. रक्त आणि पाणी सोबत वाहू शकत नाही असा दावा भाजप नेत्यांनी केला. पान 3 वर

## लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा हप्ता




राज्यातील लाखो पात्र महिलांना दर महिन्याला 1,500 रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा केले जातात. मात्र, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा हप्ता आता सप्टेंबर महिना सुरु होऊन जवळपास 10 दिवस झाले तरीही अद्याप लाडक्या बहिणींना मिळालेला नाही. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा हप्ता कधी मिळणार? याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं होतं.

दरम्यान, आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री पान 3 वर

महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना महिलांसाठी सुरु केलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून

## बंगळुरुत शिवाजी महाराजांचं नाव बदलून स्टेशनला 'सेंट मेरी' नाव; फडणवीस म्हणतात, "काँग्रेसची ही परंपरा नेहरूंपासूनची"



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राचं राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे. आधी मराठा आंदोलन व मनोज जरांगेंच्या उपोषणामुळे वातावरण तापल्यानंतर आता ओबीसी समाजानं मराठा आरक्षणासंदर्भातल्या सरकारच्या जीआरला विरोध केल्यामुळे नव्या आंदोलनाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यात सध्या दुबईत चालू असलेल्या आशिया कप स्पर्धेत 14 सप्टेंबरला होणाऱ्या भारत-पाकिस्तान सामन्याला शिवसेनेकडून (उद्धव ठाकरे गट) तीव्र विरोध होत आहे. त्यामुळे या सामन्यासमोर राजकीय विरोधाचं संकट उभं राहिल्याचं दिसत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची पहिली राजधानी राजगड, दुसरी राजधानी रायगड, शिवछत्रपतींचे जन्मस्थळ असलेला शिवनेरी किल्ला, शत्रूच्या छातीत धडकी भरविणारे साल्हेर, लोहगड, खांदेरी, प्रतापगड, सुवर्णदूर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग हे महाराष्ट्रातील 11 किल्ले व तामिळनाडूतील जिंजी अशा एकूण 12 किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे. पान 3 वर

## 17 सप्टेंबरला बीड-नगर रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार

### जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी



बीड, दि. 11 (जिमाका) : बीड जिल्ह्यात बहुचर्चित असलेली रेल्वे प्रत्यक्षात 17 सप्टेंबर 2025 मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी रोजी सुरु होणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरु आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी ब्रिजेशकुमार सिंग, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व इतर अधिकारी यांनी आज बीड येथील रेल्वे स्टेशन परिसराची पाहणी केली. बीड-नगर रेल्वेला 17 सप्टेंबरला हिरवी झेंडी पान 3 वर

## परळीत विस्तार अधिकाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या ; कारण मात्र गुल्दस्त्यात


**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**



परळी वैजनाथ शहरातील शिवाजीनगर परिसरात बीड पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असणारे विस्तार अधिकाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना गुरुवार दि. 11 सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास कळाली आहे. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, परळी वैजनाथ शहरातील शिवाजीनगर भागात वास्तव्यास असलेले व बीड पंचायत समिती कार्यालयातील विस्तार अधिकारी यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. 11 सप्टेंबर रोजी सकाळी उघडकिस आली आहे. विलास डोगरे असे आत्महत्या ग्रस्त व्यक्तीचे नाव आहे. आत्महत्याचे कारण मात्र समजले नाही. विलास डोगरे यांच्या पाश्चत तीन मुली, आई पत्नी, भाऊ असा परिवार आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. विलास डोगरे यांनी परळी पंचायत समिती कार्यलया अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचाय मध्ये ग्रामविकास अधिकारी म्हणून पान 3 वर

## डोक्यातला चमत्कार – आपला मेंदू



आपल्या डोक्यात एक खास अवयव असतो – त्याला मेंदू म्हणतात. हा मेंदू प्लास्टिकचा नाही, पण खूप मऊ असतो. तो अगदी जेली सारखा दिसतो.

मेंदू बनलेला कशाचा आहे?

मेंदूत लाखो-करोडो छोटे छोटे न्यूरॉन्स नावाचे दिवे असतात. हे दिवे एकमेकांना जोडलेले असतात आणि ते सतत पेटत-निवत असतात. यामुळे आपण बघतो, बोलतो, खेळतो, शिकतो.

**मेंदूला पाणीही असते!**

आपल्या मेंदूभोवती एक विशेष पाणी असते. त्याला सिरेब्रोस्पायनल फ्लुइड म्हणतात. हे पाणी मेंदूला धक्का बसू देत नाही आणि त्याला खायला-प्यायलाही मदत करते.

**मेंदू शिकतो कसा?**

जेव्हा आपण नवीन गोष्ट शिकतो – जसं की सायकल चालवायला किंवा पाढे म्हणायला – तेव्हा हे न्यूरॉन्स नवीन रस्ते तयार करतात. जसे आपण खेळायला नवीन पायवाट बनवतो, तसेच!

**निर्णय कोण घेतो?**

मेंदूचा पुढचा भाग – फ्रंटल लोब – हा आपला बॉस आहे. तो ठरवतो काय करायचं, कधी बोलायचं, कसा निर्णय घ्यायचा.

थोडक्यात, आपला मेंदू हा एक खरा चमत्कार आहे. तो शिकतो, विचार करतो आणि आपल्याला हुशार बनवतो.

**लेखक मुक्त पत्रकार धनंजय माने**
**महाराष्ट्र सॅम्पल डेटा निरीक्षक**

## उपजिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभाग धूळखात; जनरल फिजिशियन नसल्याने लाखों रुपये पाण्यात




### ➡ गोरगरिब रुग्णांचे मात्र हाल

**परळी वैजनाथ**

सर्व सोयीसुविधा उपलब्ध असलेल्या परळी उपजिल्हा रुग्णालयात जनरल फिजिशियन डॉक्टर नसल्याने अतिदक्षता विभाग (ICU) बंद आहे लाखों रुपयांचे वैद्यकीय साहित्य धूळखात पडून आहे. तसेच अत्यावश्यक रुग्णांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद दवाखाना अथवा खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत असल्याने नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे.

परळी शहरातील मध्यवर्ती भागात 100 खाटांची क्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात दररोज दीड हजार रुग्ण तपासणीसाठी येत असतात. अस्थिव्यंग तज्ञ, बालरोगतज्ज्ञ सह विविध तज्ञ डॉक्टर, सिटी स्कॅन, पान 3 वर

परळी उपजिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभाग चालू नसल्याने गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी खाजगी दवाखान्यात अथवा अंबेजोगाई येथे जावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड बसत आहे. उपजिल्हा रुग्णालयात सर्व सुविधा उपलब्ध आहेत, जर अतिदक्षता विभाग सुरु झाला तर सर्वसामान्यांची वैद्यकीय सोय होईल. राज्याच्या कॅबिनेट मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून लवकरात लवकर फिजिशियन ची नेमणूक करून अतिदक्षता विभाग चालू करण्यासाठी प्रयत्न केले जातील.



**अश्विन मोगरकर,**
**सरचिटणीस, भाजपा**
**परळी वैजनाथ**



अतिदक्षता विभाग कार्यरत होण्यासाठी जनरल फिजिशियन डॉक्टर उपजिल्हा रुग्णालयात नसल्याने अतिदक्षता विभाग कार्यरत नाही. जिल्हा आरोग्य विभागाकडे जनरल फिजिशियन डॉक्टर मिळावा यासाठी आम्ही पाठपुरावा करतोय, उपलब्ध होताच अतिदक्षता विभाग सुरु करण्यात येईल.

**डॉ. अरुण गुट्टे,**
**वैद्यकीय अधीक्षक,**
**उपजिल्हा रुग्णालय, परळी वैजनाथ**

# व्यसनाला मुठमाती देऊया आणि यशाला काबीज करूया

आजकाल शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यशाचे व्यसन करायचे सोडून विनाशाच्या व्यसनाच्या मागे धावत पळत सुटले आहेत. आणि दारु, गांजा, तंबाखू व सिगारेट यांचे व्यसन करून स्वतःचे जीवन बरबाद करून अधोगतीला नेत आहेत. त्यांना नशाबाज व अमली पदार्थांचे व्यसन केल्याशिवाय जीवाला जराही चैन व आराम पडत नाही. आपण पाहतोय की, काही महाभाग एवढे व्यसनाधीन झालेले दिसतात की, त्यांना वेळेवर जर दारू, गुटखा, तंबाखू किंवा गांजा मिळाला नाही तर त्यांचा दिमाख व मनस्थिती व्यवस्थित काम करत नाही. ते कोणालाही न बोलता मनोरुग्णासारखे एकांतात गप्पगार बसून राहतात. नशाबाज व्यसन वेळेवर नाही सेवन केले तर त्यांच्या अंगाला थरथरी सुटते. एकदा व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलेली माणसे त्या विखारी विळख्यातून लवकर सुटतील याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही. आणि व्यसनमुक्त होण्याचे ओरिजनल औषध अजून तरी बाजारात उपलब्ध झाले नाही. आपण बारकाईने निरीक्षण केल्यावर आपल्याला असे दिसून येईल की, आजकाल मिसरुड न फुटलेले तिसरी व चौथीचे विद्यार्थी सुद्धा वाईट व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. ते यशाचे म्हणजेच शालेय व शैक्षणिक अभ्यासाचे व्यसन करायचे सोडून अमली पदार्थांचे, जे की शरीराला हानिकारक आहेत, अशा नशाबाज व वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत. वर्गात बसून सुपारी, गुटखा, तंबाखू व गांजा यांचे व्यसन करत आहेत. आणि वर्गातील भिंती, कोपरे व फरशी यांच्यावर पिचकाऱ्या मारून वर्ग खोली रंगवून टाकत आहेत. म्हणजे आजकालचे विद्यार्थी चांगल्या व्यसनाच्या आहारी जायचे सोडून वाईट व्यसनाच्या आहारी लवकर जात आहेत. शाळेतील वर्ग खोल्यांमध्ये जाऊन भिंतीचे जर बारकाईने निरीक्षण केले तर आपल्याला असे दिसून येईल की, शाळेतील विद्यार्थी सुपारी खाऊन भिंतीवर थुंकत आहेत आणि वर्गाच्या भिंती लाल भडक करत आहेत. त्यामुळे सर्व भिंती रंगून गेलेल्या आपल्याला पाहायला मिळतील. असे व्यसनाधीन व नशाबाज विद्यार्थी प्रत्येक शाळेत व महाविद्यालयात आपल्याला पाहायला मिळतील. यांना वेळेवर व्यसन केल्याशिवाय मनाला शांती व समाधान मिळत नाही. ही आत्ताची पिढी व्यसनाच्या एवढी आहारी गेली आहे की, त्यांना व्यसनामुळे आपल्या शरीरावर किती हानी होते, याचे जरासे ही भान आत्ताच्या युवा पिढीला राहिले नाही.ते व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःचे भवितव्य धोक्यात घालत आहेत. अशा वाईट व नशाबाज व्यसनाने माणसाचे आरोग्य खराब होत असते, तसेच माणसाला वेगवेगळे आजार जडतात. माणूस दीर्घायुष्य जगायचे सोडून अल्पायुष्य जगतो. याचा परिणाम असा होतो की, वेळेवर लग्न न होणे, लग्नासाठी चांगले स्थळ न मिळणे आणि समाजात, गावात व पाहुण्यांच्या नजरेत आपली प्रतिष्ठा कमी होणे हे परिणाम आपल्याला भोगावे लागतात. म्हणून माणसाला जीवनात आरोग्याला धोका पोहोचणारे आणि माणसातून उठवणारे व्यसन न करता माणसाला सन्मानाने व स्वाभिमानाने माणसात बसवणारे यशाचे मंगलमय व्यसन असावे. तरच आपल्याला जीवनात किंमत आहे. नाहीतर व्यसनी माणसाला समाजात काय अस्तित्व आहे? हे आपण पाहतोय. व्यसनी माणसाच्या घरात कधीच सुख, समाधान, बरकत व शांती पाहायला मिळत नसते. त्यांच्या घरात नेहमी भांडण तंटे होतात, खाण्यापिण्याची आबाळ होते. त्या घराकडे माणूस तुच्छतेने बघतो. त्यासाठी माणसाने स्वतःच्या जीवनाचे व स्वतःच्या घराबाळाचे वाटोळे करणारे व्यसन न करता जीवनाचे भले व कल्याण करणारे चांगले व्यसन करावे, चांगले छंद जोपासावे, अभ्यासाचे व्यसन आत्मसात करावे आणि आपल्या जीवनाला घडवावे. पण मित्रहो माणसाला चांगले व्यसन लवकर न जडता वाईट व्यसनाच्या आहारी विद्यार्थी लवकर जात असतात. आणि स्वतःला विनाशाच्या खाईत लोटत असतात. माणसाला चांगले व्यसन असावे, जेणेकरून ते व्यसन केल्यावर माणसाच्या जीवनाचा कायापालट होईल. आणि तो यशोशिखरावर लीलया व सहजपणे पोहोचेल. विद्यार्थ्यांच्या जीवनातील काळोख दूर होऊन माणसाचे जीवन सुखी व आनंदी होईल. माणसाला व्यसन वाचनाचे असावे, डॉक्टर किंवा अभियंता होण्याचे असावे, वकील किंवा प्राध्यापक होण्याचे असावे, मोठा अधिकारी किंवा कलेक्टर होण्याचे असावे, मोठा लेखक किंवा वक्ता होण्याचे असावे, सामाजिक कार्यकर्ता किंवा समाजसेवक होण्याचे असावे. जेणेकरून आपल्या जीवनात सुखाचा व आनंदाचा पाऊस कायम बरसत राहील. पण आजकाल मुलांना चांगले व्यसन नको वाटत आहे. आणि वाईट व्यसनाच्या विखारी विळख्यात विद्यार्थी लवकर ओढले जात आहेत. ज्या वयात विद्यार्थ्यांनी खूप खूप अभ्यास व चिंतन करून यशाला काबीज करायला पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या मैदानात उतरून स्पर्धा परीक्षेची तयारी केली पाहिजे. पण विद्यार्थी या क्षेत्रात भरपूर वाचन व अभ्यास न करता कॉपीच्या व ग्रेसच्या जीवावर पास होत आहेत आणि सुशिक्षित बेकारांचे लेबल लावून व विकतची डिग्री घेऊन मिरवत आहेत. असेच म्हणावे लागेल. मित्रहो मग तुम्हीच सांगा, हे कॉपी बहाद्दर विद्यार्थी भविष्यात खरंच घडतील का हो? यांचे भविष्य खरंच तेजस्वी ताऱ्याप्रमाणे उज्ज्वल असेल का हो? असले व्यसनी, टवाळखोर,आवारा व मवाली विद्यार्थी आपल्या देशाचे आधारस्तंभ होतील का हो? या प्रश्नाचे उत्तर नाही असेच येणार आहे. डॉ. एपीजे अब्दुल कलाम म्हणायचे या देशाची खरी ताकद ही आजची युवा पिढी आहे. या देशातील युवकच उद्याच्या देशाचे निर्माते आहेत. या देशातील तरुण युवक जेवढे सक्षम व प्रबळ असतील तेवढा देश मजबूत व भक्कम असेल. हा देश जर आपल्याला मजबूत व भक्कम करायचा असेल तर आपल्याला वाईट व्यसनाचा त्याग करावा लागेल. दारु, गांजा, तंबाखू व सिगारेट या विखारी व्यसनाला मूठमाती द्यावी लागेल. आपल्या शरीराला हानिकारक असणाऱ्या व्यसनापासून चार हात लांब राहावे लागेल. व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकून स्वतःचा विनाश करून घेण्यापेक्षा आपले भवितव्य उज्ज्वल करणारे आणि आपल्या जीवनाचे सोने करणारे पुस्तक रुपी स्वच्छ व निर्मळ व्यसन म्हणजेच ज्या व्यसनातून समाजाला व देशाला काहीतरी लाभ होईल, असे यशाचे व्यसन करून स्वतःचा, समाजाचा, गावाचा आणि देशाचा विकास साधावा...अमंगळ, दूषित, कलुषित आणि विखारी व्यसनांना कायमचे मातीत गाडूया आणि डॉक्टर, कलेक्टर, अभियंता, इंजिनीयर, प्राध्यापक, वकील, लेखक, कवी, तहसीलदार, निस्वार्थ राजकारणी होण्यासाठी खूप खूप अभ्यास करूया...या पदांना काबीज करण्यासाठी जीवाचे रान करावे... अहोरात्र मेहनत व चिंतन करून या व्यसनाचे यशात रूपांतर करून यशाला काबीज करावे आणि हे यशाचे व्यसन जीवनभर जोपासावे.. आपल्याला एखाद्या विशिष्ट यशाला साध्य करण्यासाठी अहोरात्र परिश्रम व कष्ट करून यशाला गवसणी घालावी... वाईट व जीवघेण्या व्यसनांचा त्याग करून यशाचे व्यसन बाळगून यशाचा पाठलाग करावा आणि यशाला खेचून आणावे म्हणजे एक दिवस तुमचे नाव नक्कीच इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल, असे मला मनोमन वाटते...आणि जर वाईट व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलात तर तरुणपणातच म्हातारे होऊन एक दिवस कायमचे मरून जाणार एवढे मात्र नक्की....

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी,ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.7498715661**

# साथ कृषीकुलची ; यशोगाथा बळिराजाची !

## फळबाग लागवड केल्याने उत्पन्न वाढले; आर्थिक स्तर उंचवल्याने शेतकरी सुखावले

पारंपरिक पीक पद्धती बदलून फळबागांची लागवड केल्याने शेतकऱ्यांच्या जीवनमानात आणि कौटुंबिक आर्थिक परिस्थितीत मोठा आमूलाग्र बदल घडून येत असल्याचे पाहायला मिळत आहे. जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेल्या ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल मुळे हे बदल घडवण्याची किमया साकार होऊ शकली. ज्यामध्ये एचडीएफसी बँकेचे सुद्धा खूप मोठे योगदान आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न 30 हजारांहून वाढून 03 लाखांपर्यंत म्हणजेच दहा पटींनी उंचावले आहे. हे सकारात्मक बदल घडून आल्याने शेतकरी प्रचंड समाधानी झाले आहेत. येथील शेती ही कायम संकटाच्या गर्तेत असते. कधी येथे पाण्याचा दुष्काळ असतो तर कधी येथे शेतकऱ्यांना जास्त पावसामुळे नुकसान झेलावे लागते. याला पर्याय जर काही असेल तर आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेती आणि शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन वेळेवर मिळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची ही गरज ग्लोबल विकास ट्रस्ट संस्थेच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याने शेतकरी समाधानी आहेत. शेतीतील उत्पादन वाढल्याने त्यांचे आर्थिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनमान निश्चित उंचावले आहे.

जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेली ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था शेतकऱ्यांना फळपीक लागवड करण्याच्या संदर्भात मोफत प्रशिक्षण देते. सिरसाळा येथे उभारण्यात आलेल्या कृषीकुलच्या भव्य संकुलात शेतकऱ्यांना दोन दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते. ज्यामध्ये माती परीक्षण, मातीतील गुणधर्मानुसार पिकांची निवड, पिकांची निवड केल्यानंतर त्याची लागवड, वातावरणातील बदलांचा विचार करून पिकांची योग्य पद्धतीने काळजी कशी घ्यावी? त्याचबरोबर पिकांची काढणी करून त्याला योग्य पद्धतीने भाव कसा मिळेल? या दृष्टीने शेतकऱ्यांना बाजाराची योग्य माहिती देऊन त्याचे उत्पादन विक्री होईपर्यंत कृषिकुलच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. यामुळे नक्कीच फळपिकांचे दर्जेदार उत्पादन मिळून शेतकऱ्यांना योग्य पद्धतीचा भाव मिळतो.

शेतकऱ्यांना योग्य आणि दिशादर्शक मार्गदर्शन मिळाल्याने त्यांच्यातील शाश्वत शेती करण्याची नवी उमेद जागृत होऊ शकली आहे. बीड जिल्ह्यातील शेतकरी ऊस, कापूस, सोयाबीन आदि पारंपरिक पिकांवर पूर्वी अवलंबून असायचे, ज्यामधून त्यांना जेमतेम आर्थिक उत्पन्न मिळत असे. मात्र आता ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुलच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन आणि सल्ला मिळाल्याने फळपिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागला आहे. आंबा, केळी, सीताफळ, डाळिंब इत्यादी पिकांची लागवड केल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. पारंपरिक शेतीत बदल करून फळबागांकडे शेतकऱ्यांचा कल वाढल्याने परिवर्तनाची फार मोठी नांदी दिसून येते.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असलेल्या सादोळा येथील शेतकरी राहुल अरुण इंगळे आणि काशीनाथ नवनाथ इंगळे या शेतकऱ्यांची यशोगाथा अशीच आहे. हे शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टच्या संपर्कात आले. त्यांना जलनायक मयंक गांधी करीत असलेल्या कामाची संपूर्ण माहिती मिळाली. या माहितीने प्रेरित होऊन त्यांनी फळबाग लागवड करण्याचा निश्चय केला. सिरसाळा येथील कृषीकुल मध्ये त्यांना केळी लागवड तंत्राचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले. ज्यामध्ये माती परीक्षण, लागवड, पाणी पद्धती, रोपांची सेंद्रिय पद्धतीने वाढ येथपासून ते काढणीपर्यंत त्यांना सर्व बाबी शिकवण्यात आल्या. पूर्वी ते सोयाबीन किंवा हरभरा या पिकांवर अवलंबून असायचे, मात्र पीक पद्धतीत बदल केल्यामुळे त्यांचे 20 हजारावरील उत्पन्न वाढून जवळपास 4 लाख 65 हजारांपर्यंत वाढले. विशेषतः कायम आर्थिक विवंचनेत असलेल्या इंगळे कुटुंबाची कौटुंबिक आणि आर्थिक स्थिती भक्कम झाली. मिळालेल्या पैशांतून ते आता मुलांना दर्जेदार शिक्षण देऊ शकत आहेत, बँकांचे घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करू शकत असल्याने ते आज प्रचंड समाधानी झाले आहे. जलनायक मयंक गांधी यांनी उभारलेल्या कृषिकुल मुळे आज आमच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला असल्याचेही ते सांगतात.

### ➡ यशोगाथा -1




ग्लोबल विकास ट्रस्ट सोबत जोडलेला अनुभव व सहकार्य - माझे नाव राहुल अरुण इंगळे असून, मी केज तालुक्यातील सादोळा या गावाचा रहिवासी आहे. पूर्वी मी पारंपारिक पद्धतीने सोयाबीन हे पीक करत होतो. जसे पाहिजे तसे उत्पन्न मिळत नव्हते. नंतर मला ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेची माहिती भेटली. संस्था फळबाग लागवड करण्यास इच्छुक असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना मदत करते. नंतर मी ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेकडे केळी लागवडीसाठी अर्ज केला आणि 1600 केळी रोपांची बुकिंग केली. मार्केटमध्ये ज्या रोपाची किंमत अठरा ते वीस रुपये पर्यंत आहे तेच रोप आम्हाला संस्थेकडून आठ रुपये दराने भेटले. केळी रोप भेटल्यानंतर मी त्याची लागवड केली. संस्थेकडून मला वेळोवेळी मार्गदर्शन भेटत होते. संस्थेचे कर्मचारी वारंवार माझ्या केळी प्लॉटला भेट देत होते. ज्यामुळे मला खूप फायदा झाला. तसेच कृषीकुल ट्रेनिंग सेंटर सिरसाळा या ठिकाणी केळी लागवडीपासून ते काढण्यापर्यंत भरपूर गोष्टीत्यांनी शिकवल्या व यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली. सांगायचं झालं तर ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडून माझा फायदा झाला.

ग्लोबल विकास ट्रस्ट संस्थे मुळे उत्पन्नात वाढ - खरं सांगायचं झालं तर ग्लोबल विकास ट्रस्ट संस्थेमुळे माझे वार्षिक उत्पन्न वाढले आहे. पूर्वी मी पारंपरिक सोयाबीन हे पीक करायचो, यामध्ये सर्व खर्च जाऊन मला 20 ते 25 हजार रुपये प्रति एकर राहायचे. मी ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेकडून कमी दरातील केळी रोप घेतले मी एक एकर मध्ये 1600 केळी रोपांची लागवड केली होती त्या एक एकर मधून मला निव्वळ नफा -465000 रु इतका झाला. यामुळे मी खूप समाधानी आहे.

**- दत्तात्रय काळे (9558488686)**




मिळालेल्या उत्पन्नाचा विनीयोग वापर - केळी लागवडीतून मिळालेल्या भरघोस उत्पन्नातून माझ्या मुलांचा शिक्षणाचा खर्च. शिक्षणाचा भविष्याचा खर्च, तसेच दैनंदिन गरजा व बँकेकडून घेतलेले थोड्या कर्जाची आता परतफेड करता येणार आहे. इतर शेतकऱ्यांना संदेश - मी सर्व शेतकऱ्यांना सांगू इच्छितो की माझे वार्षिक उत्पन्न वाढले तसे तुमचे पण नक्की वाढणार आहे. परंतु त्यासाठी पारंपारिक शेतीपेक्षा फळबागेकडे वळणे गरजेचे आहे. सोयाबीन, कापूस, हरभरा, यासारख्या पारंपारिक पिकांमधून पाहिजे तेवढे उत्पन्न भेटत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी फळबाग करणे गरजेचे आहे. फळबाग करत असताना ग्लोबल विकास ट्रस्ट सारख्या संस्थेकडून फळबाग लागवड करा, जेणेकरून योग्य दिशा व योग्य मार्गदर्शन भेटेल आणि त्यामुळे फळबाग लागवड करत असताना तुमचा नक्कीच फायदा होईल.

**नाव - राहुल अरुण इंगळे**

- **गाव - सादोळा, ता-केज, जिल्हा -बीड एकूण क्षेत्र (एकर) - 1.15, पूर्वीचे पिक - सोयाबीन , प्रति एकर उत्पन्न - 30000, आत्ताचे उत्पन्न : 465000**

### ➡ यशोगाथा -2

ग्लोबल विकास ट्रस्ट सोबत जोडलेला अनुभव व सहकार्य - माझ नाव काशिनाथ नवनाथ इंगळे असून मी केज तालुक्यातील सादोळा या गावाचा रहिवासी आहे. ग्लोबल विकास ट्रस्ट सोबतचा अनुभव सांगायचं म्हणलं तर खूप छान होता. पूर्वी मी पारंपारिक सोयाबीन, ज्वारी हे पीक करत होतो, पाणी भरपूर होते. एक विहीर होती, बोअरवेल होते तरी पण मी पारंपारिक पिके घेत होतो मात्र जसे पाहिजे तसे उत्पन्न मिळत नव्हते. एक दिवशी मला गावामध्ये ग्लोबल विकास ट्रस्टचे कर्मचारी मीटिंग घेण्यासाठी आले होते व तेंव्हा त्या मीटिंगमध्ये मी गेलो असता मला फळबाग लागवड बद्दल समजले. नंतर मला ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेची माहिती भेटली. संस्था फळबागेवर काम करते असे समजले. नंतर मी ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेकडे केळी लागवडीसाठी अर्ज केला. मी संस्थेकडे 3000 केळी रोपांची बुकिंग केली. मार्केटमध्ये ज्या रोपाची किंमत अठरा ते वीस रुपये पर्यंत आहे तेच रोप मला संस्थेकडून आठ रुपये या दराने भेटले. केळी रोप भेटल्यानंतर मी ते लागवड केली. व संस्थेकडून मला वेळोवेळी मार्गदर्शन भेटत होते. संस्थेचे कर्मचारी वारंवार माझ्या केळी प्लॉटला भेट देत होते. ज्यामुळे मला खूप फायदा झाला. तसेच आम्ही केळी लागवड केलेले सर्व शेतकऱ्यानं निवासी कृषीकुल ट्रेनिंग सेंटर सिरसाळा या ठिकाणी येथील तज्ञ प्रशिक्षक यांनी आम्हाला केळी लागवड बद्दल संपूर्ण मार्गदर्शन केले. तिथे राहण्याची सोय, चहा, नाष्टा, जेवनाची सोय एकदम छान प्रकारे केली होती. सांगायचं झालं तर मराठवाड्यात असे कृषीकुल ट्रेनिंग सेंटर कुठेच नाही. आदरणीय मयंक सरांनी कृषीकूल ट्रेनिंग सेंटर उभे करून शेतकऱ्यांसाठी फार मोठी उपलब्धी निर्माण केली आहे. सांगायचं झालं तर ग्लोबल विकास ट्रस्ट सोबत जोडून माझा फायदाच फायदा झाला.

ग्लोबल विकास ट्रस्ट संस्थेमुळे उत्पन्नात वाढ - खरं सांगायचं झालं तर ग्लोबल विकास ट्रस्ट संस्थेमुळे माझे वार्षिक उत्पन्न वाढले आहे. पूर्वी मी पारंपरिक सोयाबीन, ज्वारी हे पीक करायचो. यामध्ये सर्व खर्च जाऊन मला 22 ते 25 हजार रुपये प्रति एकर राहायचे. मी ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेकडून कमी दरातील केळी रोप घेतले मी दोन एकर मध्ये 3000 केळी रोपांची लागवड केली होती त्या एक एकर मधून मला निव्वळ नफा - 500000 रु इतका झाला. यामुळे मी खूप समाधानी आहे. उत्पन्नामध्ये फार मोठा बदल झाला आहे. पहिल्या उत्पन्नापेक्षा 15 ते 20 पटीने माझे उत्पन्न वाढले आहे.

मिळालेल्या उत्पन्नाचा विनीयोग वापर - केळी लागवड करून मला जे उत्पन्न भेटले आहे त्या उत्पन्नाचा योग्य पद्धतीने वापर करत आहे. यामध्ये माझ्या घराचे काम, तसेच माझ्या मुलांचा शिक्षणाचा खर्च. शिक्षणाचा भविष्याचा खर्च, तसेच दैनंदिन गरजा, तसेच मुलीच्या नावावर बँक मध्ये पैसे ठेवणार आहे, जेणेकरून भविष्यात त्याचा वापर योग्य वेळी होईल. इतर शेतकऱ्यांना संदेश - मी मराठवाड्यातील सर्व शेतकऱ्यांना सांगू इच्छितो की सध्याची परिस्थिती पाहिली तर पारंपारिक पिकातून काही उत्पन्न मिळत नाही. आणि लागवडीपासून ते काढणीपर्यंतचा जर खर्च लिहून ठेवला तर आपल्याला लक्षात येईल की आपल्याला सोयाबीन व पारंपारिक पिकांमधून उत्पन्न भेटत नाही. तुम्हा सर्व शेतकऱ्यांना शेतामधून चांगले उत्पन्न घ्यायचे असेल तर फळबाग लागवड करणे गरजेचे आहे. मी ग्लोबल विकास ट्रस्ट अंतर्गत केळी लागवड करून चांगले उत्पन्न कमावले आहे. तुम्ही कोणतीही फळबाग करा परंतु फळबाग करत असताना योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन, खूप महत्त्वाचे ठरते. त्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट अशा संस्थेकडून फळबाग लागवड करा व तुमचे वार्षिक उत्पन्न वाढवा. ग्लोबल विकास संस्था ही संस्था फक्त फळबागेसाठी रोपे देत नाही तर एकदम कमी किमतीमध्ये रोपे देऊन तुम्हाला मोफत मार्गदर्शन सुद्धा करते. अशा संस्थेमुळे फळबाग लागवड करत असताना तुमचा नक्कीच फायदा होणार आहे.

- **एकूण क्षेत्र (एकर) - 2, पूर्वीचे पिक - सोयाबीन, प्रति एकर उत्पन्न - 25000, आत्ताचे उत्पन्न - 500000**

**नाव - काशिनाथ नवनाथ इंगळे, गाव - सादोळा, ता -केज, जि- बीड**

# महाराष्ट्रातील आरक्षण धोरणाची संवेदनशीलता

**डॉ. भारत कऱ्हाड**

महाराष्ट्र राज्य सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विविधतेने नटलेले असून इथल्या समाजरचनेत अनेक जाती-जमाती, परंपरा आणि गट एकत्र राहतात. या विविधतेत शतकानुशतके अन्याय सहन करणाऱ्या घटकांना न्याय देण्यासाठी आरक्षण हे साधन म्हणून वापरले गेले. त्यामुळे आरक्षण हे केवळ शैक्षणिक वा रोजगारातील सवलत नसून ते सामाजिक न्यायाची कल्पना प्रत्यक्षात आणणारे धोरण आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील आरक्षणाचा प्रश्न नेहमीच संवेदनशील ठरतो.

आरक्षणाचा ऐतिहासिक पाया पाहिला तर भारतीय समाजात जातीय विषमता मोठ्या प्रमाणात होती. काही जातींना शिक्षण, जमीन आणि संधी उपलब्ध होती तर बहुसंख्य घटक या संधींपासून वंचित होते. संविधान निर्मात्यांनी या विषमतेचा विचार करून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त भटक्या जमाती अशा गटांना आरक्षणाची हमी दिली. महाराष्ट्रानेही याच परंपरेनुसार विविध गटांना आरक्षण लागू केले. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात हक्क मिळावा अशी अपेक्षा प्रत्येक समाजघटकाची आहे. यामुळे आरक्षण हा नेहमीच संघर्षाचा विषय ठरतो.

महाराष्ट्रातील आरक्षण धोरणावर राजकीय छाप खोलवर आहे. निवडणुकांच्या काळात आरक्षणाचे आश्वासन देऊन मोठ्या समाजघटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. एक गट मागणी करत असताना दुसरा गट आपला हिस्सा कमी होईल या भीतीने विरोध करतो. या ताणतणावामुळे सरकारसमोर संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. OBC समुदाय याचे उत्तम उदाहरण आहे. सुमारे साडेतीनशे जाती या गटात आहेत, परंतु त्यांना मिळालेल्या निधी आणि संधी मर्यादित आहेत अशी भावना सतत व्यक्त केली जाते. उलट काही इतर गटांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाल्याने OBC मध्ये असंतोष वाढतो.

याच पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाचा मुद्दा गेल्या दशकात अत्यंत गाजला. ग्रामीण भागातील, विशेषतः शेतकरी वर्गातील आर्थिक संकट आणि शैक्षणिक मागासलेपण यामुळे मराठा समाजाने आरक्षणाची मागणी केली. राज्य सरकारने कायदे करून मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण देण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्वोच्च न्यायालयाने 2018 मधील SEBC कायदा रद्द केला आणि 50 टक्क्यांच्या मर्यादेपलीकडे आरक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा अनिश्चिततेत अडकला आणि तो अधिकच संवेदनशील झाला.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन OBC आरक्षणाचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न झाला तेव्हा हा वाद आणखी तीव्र झाला. कारण कुणबी जाती आधीपासून OBC अंतर्गत समाविष्ट आहे. जर मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र सहजपणे मिळाले तर OBC चा हिस्सा कमी होईल अशी भीती व्यक्त केली गेली. या विषयावर सरकारने पडताळणीची प्रक्रिया ठेवली असली तरी OBC प्रतिनिधींनी या GR मधील शब्दांवर आक्षेप घेतला आणि हा निर्णय त्यांच्या हक्काला बाधक ठरेल असे सांगितले. हा मुद्दा आता न्यायालयीन प्रक्रियेत आहे आणि अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे.

आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात पोहोचला की त्याचे गांभीर्य अधोरेखित होते. सर्वोच्च न्यायालयाने 2021 मध्ये दिलेल्या निर्णयात आरक्षणाची मर्यादा, मागासलेपण सिद्ध करण्याची अट आणि तथ्याधारित अभ्यास यावर भर दिला. केवळ लोकसंख्या मोठी आहे म्हणून आरक्षण देता येणार नाही हे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे सरकारला आता प्रत्येक समाजघटकाच्या मागणीचा वैज्ञानिक, सांख्यिक आणि कायदेशीर अभ्यास करूनच पुढे जावे लागते.

आरक्षणातील संवेदनशीलतेची कारणे अनेक आहेत. लोकसंख्या मोठी आणि संसाधने मर्यादित असल्यामुळे प्रत्येकाला आपला वाटा कमी मिळतोय असे वाटते. काही गट ऐतिहासिकदृष्ट्या वंचित आहेत तर काही गट आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही आरक्षणाची मागणी करतात. राजकीय हस्तक्षेपामुळे या मागण्यांना अधिक तीव्रता येते. याशिवाय 50 टक्क्यांच्या मर्यादेचे घटनात्मक बंधन सरकारला अडचणीत आणते. त्यामुळे एका गटाला सवलत दिली की दुसरा गट वंचित राहतो आणि संघर्ष वाढतो.

या संवेदनशीलतेतून मार्ग काढण्यासाठी काही उपाय सुचवले जातात. आर्थिक दुर्बल घटकांसाठी वेगळ्या योजना वाढवणे हा एक उपाय आहे. फक्त आरक्षण न देता दर्जेदार शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना वाढवणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत कठोर पडताळणी करून बनावट कागदपत्रांचा गैरवापर थांबवणे गरजेचे आहे. सरकारने प्रत्येक निर्णय पारदर्शकतेने घेऊन सर्व गटांचा संवाद घ्यावा आणि विकासाच्या कार्यक्रमात समतोल राखावा.

निष्कर्ष असा की महाराष्ट्रातील आरक्षण धोरण ही केवळ नोकरी वा शिक्षणातील सवलत नसून सामाजिक न्यायाची कल्पना जपणारी रचना आहे. मात्र या रचनेत प्रत्येक गटाची अपेक्षा, ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि वर्तमान परिस्थिती लक्षात घेणे अनिवार्य आहे. एका गटाला न्याय देताना दुसऱ्याचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे हे सरकारसमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे. आरक्षण धोरण महाराष्ट्रात कायम संवेदनशील राहणार आहे, पण संवाद, संशोधन आणि न्याय्य वाटपाच्या माध्यमातून या संवेदनशीलतेत संतुलन साधता येईल.

**डॉ. भारत कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

निर्णयाचा सर्वाधिकार दिले आहेत. पण आता केंद्रीय निवडणूक आयोगानं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आल्यानं सर्वच राजकीय पक्षांची धडधड वाढवली आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देशातील सर्वच राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची परिषद बोलावण्यात आली होती. आयोगाच्या याच परिषदेत देशातील मतदारयाद्यांच्या फेरतपासणीसाठी आढावा घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.यामुळे स्थानिकच्या निवडणुकांआधी मतदारयाद्यांच्या फेरतपासणी होण्याची शक्यता आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं मतदारयाद्यांच्या फेरतपासणीबाबतचा निर्णय जाहीर केला, तर यावर विरोधकांकडून राजकीय वातावरण तापवलं जाण्याची शक्यता आहे. बिहारप्रमाणेच महाराष्ट्रातही निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाची गुरुवारी (ता.11) महत्वाची परिषद पार पडली. या परिषदेमध्ये मतदारयाद्यांची फेरतपासणीची तयारी आणि प्रत्यक्ष विशेष मतदारयादी परीक्षण कधी राबवण्यात येऊ शकतं याबाबतचा आढावा घेण्यात आला.निवडणूक आयुक्तांच्या परिषदेत राज्याच्या मुख्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्या.त्यात महाराष्ट्रात नवे मतदार पोलिंग स्टेशनची तयारी, निवडणुकीआधी मतदारयादीची सखोल फेरतपासणीची शक्यता यांसह 1200 हून अधिक मतदार एका मतदान केंद्रावर नसतील या विषयी दक्षता घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------------------------------

मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ऐन गणेशोत्सवादरम्यान मुंबई चलो चा नारा दिला. येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले. ज्याला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात मराठा बांधवांकडून पाठिंबा मिळाला. तसेच हजारो मराठा बांधव मुंबईत दाखल झाले. यानंतर उपोषणाच्या पाचव्या दिवशी सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगेंची भेट घेतली आणि उपोषण मागे घेण्याची विनंती केली. यावेळी मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील आठ मागण्यांपैकी सहा मागण्या सरकारने मान्य केल्या. तसेच हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासह इतर मागण्यांबाबत शासन निर्णय (जीआर) जारी केला.या शासन निर्णयावरुन आता वादाची ठिणगी पडली असून ओबीसी संघटना आक्रमक झाल्या आहेत. ओबीसी समाज आणि ओबीसी नेत्यांचा तीव्र विरोध वाढला असून मंत्री छगन भुजबळ यांनी थेट जीआरविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. तसेच उपसमितीच्या पहिल्याच बैठकीत देखील हैद्राबाद गॅझेट लागू करणारा शासन आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.यादरम्यान आता ओबीसी समाज देखील मुंबईत लवकरच महामोर्चा काढणार असल्याची माहिती मिळत आहे. ओबीसी समाजाच्या विविध संघटनांच्या नेत्यांची ऑनलाइन बैठक आज (ता.11) होणार असून मोर्चाची रणनीती आणि अंतिम तारीख ठरवण्यात येणार आहे. पण सध्या दसऱ्यानंतर हा भव्य मोर्चा काढण्यात येईल अशी माहिती मिळत असून तो 8 किंवा 9 ऑक्टोबर रोजी होण्याची शक्यता आहे. पण यावर आजच्या बैठकीत अंतिम निर्णय होणार आहे. या बैठकीला माजी उपमुख्यमंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ देखील ऑनलाइन उपस्थित राहण्याची शक्यता आहे.दरम्यान राज्य सरकारने काढलेल्या जीआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकेतून हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला आव्हान देण्यात आले आहे. सरकारची ही अधिसूचना पूर्णपणे बेकायदा असल्याने ती रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याचिकांवर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

-----------------------------------------

आदिती तटकरे यांनी लाडक्या बहिणींना खुशखबर दिली आहे. लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा हप्ता कधी मिळणार? या विषयीची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत दिली आहे. लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थी महिलांना ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी आजपासून (11 सप्टेंबर) वितरित करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितली आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : महिला सक्षमीकरणाची अखंड क्रांती!, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस आजपासून सुरुवात होत आहे. महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरु असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. लवकरच या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे.”

-----------------------------------------

यानंतर सत्ताधाऱ्यांनी विधानसभा परिसरात जल्लोष केला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत निवेदन करत असताना, ठाकरे गटाचे सदस्य भास्कर जाधव यांनी याबाबत काही मुद्दे उपस्थित केले. सीएसटी स्थानकाचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस म्हणून नामकरण केले. परंतु, स्थानक परिसरात कुठेही छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा नाही. आपल्या देशात पहिली रेल्वे आणण्याचे काम नाना जगन्नाथ शंकरशेठ यांनी केले. त्यांचे नाव मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनला द्यावे, अशी मागणी भास्कर जाधव यांनी केली. याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.भास्कर जाधव यांच्या माध्यमातून सभागृहाला सूचित करु इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्टेशनचा भव्य पुनर्विकास सध्या सुरु असून, स्टेशन तयार करताना जो आराखडा तयार करण्यात आला आहे, त्या आराखड्यात त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. तसेच नाना जगन्नाथ शंकरशेठ यांचे मुंबईच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. मागच्या काळात एकनाथ शिंदे जेव्हा मुख्यमंत्री होते, त्यावेळेस महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनला ‘नाना जगन्नाथ शंकरशेठ’ यांचे नाव देण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार केला, तो मान्य केला, सगळी प्रक्रिया पूर्ण केली. तो प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला आहे. तो तिथे अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान, युनेस्कोच्या यादीत समाविष्ट होणे ही महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. पंतप्रधानांचे आभार मानतो. पंतप्रधानांकडे सात प्रस्ताव गेले होते. मात्र, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा प्रस्ताव मंजूर केला. इतरांनी किल्ले हे महसुली गोळा करण्यासाठी वापरले. मात्र महाराजांनी हे किल्ले स्वराज्यासाठी वापरले. युनोस्कोचे मुख्यालय पॅरिस येथे सादरीकरण झाले. यामध्ये मतदानाचा अधिकार 20 देशांना असतो. या प्रस्तावावर सर्व 20 देशांनी एकमताने निवड केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

-----------------------------------

दाखविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे येणार आहेत. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जनता या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी बैठक व्यवस्था कशी असायला पाहिजे, पार्किंग व्यवस्था कशी असावी, व्हीआयपी आणि इतर रस्ते याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे स्वत: प्रत्येक बाबींचा आढावा घेवून नियोजन करत आहेत. यावेळी रेल्वे प्रशासनातर्फे उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, रेल्वे विभागाचे विभागीय अधिकारी जितेंद्र सिंग व वरिष्ठ समन्वयक विजयकुमार रॉय तसेच अधिकारी उपस्थित होते . ही प्राथमिक पाहणी असून बैठक व्यवस्था व इतर मार्ग याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यावेळी सांगितले.

-----------------------------------------

सेवा बजावली आहे. धर्मापुरी , सिरसाळा, कन्हेवाडी ,अशा अनेक गावांत त्यानी चांगले काम करुन दाखवले आहे. विलास डोगरे यांच्या पार्थिवावर परळी तालुक्यातील खामगाव येथे सायंकाळी करण्यात आले.

-----------------------------------------

डायलेसीस सेंटर, सोनोग्राफी, एक्स रे सह विविध तापसण्यांची सुविधा उपजिल्हा रुग्णालयात असल्याने परळी शहरासह तालुक्यातून रुग्णांची संख्या जास्त आहे. सुसज्ज ऑपरेशन थेटर असल्याने रोज 5 ते 6 शस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालयात केल्या जातात. आवश्यक असेल तर सिझेरियन केले जात असल्याने शहरात सर्वात जास्त प्रसूती उपजिल्हा रुग्णालयात होतात. उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभाग तयार करण्यात आला आहे. या अतिदक्षता विभागात 40 बेड आहेत. तर बालरुग्ण विभागात 32 बेड आहेत. अतिदक्षता विभागासाठी लागणाऱ्या सर्व यंत्रसामग्री रुग्णालयात पहिल्या मजल्यावर विभागात बसवण्यात आल्या आहेत. या अतिदक्षता विभागासाठी जनरल फिजिशियन डॉक्टर ची आवश्यकता असते. काही महिन्यांपूर्वी जनरल फिजिशियन ची नियुक्ती करण्यात आली होती मात्र संबंधित डॉक्टर ने उपजिल्हा रुग्णालयात येण्याआधीच रजा टाकून बदली करून घेतली. त्यानंतर कोणीही जनरल फिजिशियन डॉक्टर न आल्याने अतिदक्षता विभाग बंद अवस्थेत आहे. लाखों रुपयांची यंत्रणा वापरावीणा धूळखात पडून आहे.

परळी वैजनाथ येथे थर्मल पॉवर स्टेशन, सिमेंट फॅक्टरी, राख वाहतूक व्यवसाय, रेल्वे स्टेशन असल्याने अनेकवेळा अपघात घडल्यास उपजिल्हा रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णास आणले जाते. अतिदक्षता विभाग चालू नसल्याने गंभीर रुग्णास अंबाजोगाई येथील स्वामी रामानंदतीर्थ रुग्णालयात पाठवले जाते. मात्र अनेकवेळा रुग्ण गंभीर असल्यास वाटेतच मृत्यू झाल्याच्या घटना घडत असतात.

अतिदक्षता विभाग सुरु नसल्याने लाखो रुपयांचा मशीन धूळखात पडून आहेत. गोरगरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड बसत आहे यामुळे जनरल फिजिशियन डॉक्टर ची त्वरित नियुक्ती करण्यात येऊन अतिदक्षता विभाग (ICU) सुरु करण्यात यावा अशी मागणी परळीतील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

-----------------------------------------

मग आमचा प्रश्न आहे की खून आणि क्रिकेट कसं सोबत वाहणार? भाजपच्या हेतुवरच प्रश्नच चिन्ह निर्माण करत राऊतांनी भाजपला धारेवर धरले..आमचा सवाल भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, भाजपच्या बड्या नेत्यांची या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याविषयी काय भूमिका आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे असे राऊत म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी या सामन्याला विरोध केला आहे. हा सामना भरवण्याचा निषेध केला आहे. तर महाराष्ट्रात महिला आघाडी रस्त्यावर येईल. माझं कुंक, माझा देश अशा प्रकारचं आंदोलन करण्यात येणार आहे. ठाकरे सेनेची महिला आघाडी रविवारी सिंदूर रक्षा आंदोलन करणार असल्याचे राऊत म्हणाले. त्यांनी यावेळी भाजपच्या धोरणाचा खरपूस समाचार घेतला. जय शाह यांच्यासाठीच हा सामना खेळवल्या जात असल्याचे सूतोवाच केले.

## पान 4 वरुन

विविध डॉक्टर्स व रुग्णालयांद्वारे झालेल्या मेडिकल निगलिजन्स केसेस या समितीद्वारे योग्य आहेत किंवा नाहीत याविषयी निर्णय घेतला जातो. त्यानुसार शासन गुन्ह्याचे स्वरुप ठरवून त्यावर डॉक्टर्स किंवा रुग्णालय प्रशासनावर कार्यवाही करते. घटनात्मकरित्या ही समिती अत्यंत जबाबदारीची व महत्त्वाची आहे. अशा महत्त्वाच्या समितीवर अंबाजोगाईचे अष्टपैलू व्यक्तिमत्व तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड झाली आहे ही तमाम अंबाजोगाईकरांच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची गोष्ट आहे असे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले. डॉ.इंगोले यांचे मनोविकृतीशास्त्रातील आतापर्यंतचे योगदान, सामाजिक कार्यातील सहभाग व विविध शासकीय समित्यांवर विविध पदावर कार्य केल्याची नोंद महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने घेत त्यांची नियुक्ती महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या मेडिकल निगलिजन्स केसेसच्या स्क्रुटिनायझिंग कमिटीवर केली आहे. डॉ.इंगोले हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. विविध क्षेत्रात ते उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अंबाजोगाईतील वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी तसेच सामाजिक क्षेत्रातील, राजकीय क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील, साहित्य क्षेत्रातील, सहकार क्षेत्रातील विविध मित्र मंडळींनी आनंद व्यक्त करीत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

-----------------------------------------

या नावाने ओळखले जात होते. ते महावितरणमध्ये सेवा करुन सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्यावर फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. बुधवार दि. 10 रोजी दररोजच्या प्रमाणे घरी आराम करत असताना अचानक रात्री 9 वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली. निधनासमयी त्यांचे वय 81 वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, तीन मुली, जावाई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे.

-----------------------------------------

केला जातो किंवा ते दिलेच जात नाही असेही निदर्शनास आले आहे. सदर प्रकार अत्यंत गंभीर असून यामुळे शासनाच्या विश्वासार्हतेवर व जनतेच्या अपेक्षांवर परिणाम होत आहे. त्यामुळे याप्रकरणी तातडीने चौकशी लावून दोषींवर कडक कारवाई करावी. जर या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले तर आम आदमी पार्टी बीड जिल्ह्यातील पीडित नागरिकांना घेऊन जिल्हा परिषद कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडल असा इशारा असे उपकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनात आम आदमी पार्टीच्यावतीने देण्यात आला आहे. यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष, रफिक पठाण अल्पसंख्यांक विभाग प्रमुख, शकील पठाण, सय्यद सादेक शहराध्यक्ष, कृष्णा जगताप तालुका अध्यक्ष, मिलिंद पाळणे कैलास, पालीवाल इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

24 किलोमीटर लांबीचा रस्ता 12 कोटी 75 लाख रुपये खर्चून एम.टी. मस्के कन्स्ट्रक्शन (जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे बंधू) यांनी केला. मात्र सुरुवातीपासूनच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामस्थांना हाल सोसावे लागत आहेत. तक्रारीनंतर थातुरमातुर ठिगळं लावण्याचं काम होतं, पण काही दिवसातच रस्त्यावरचे खड्डे पुन्हा उघडं तोंड करून उभे राहतात. आता तर परिस्थिती भीषण बनली असून अनेक ठिकाणी मोठे भगदाड पडून पुलांच्या नळ्या उघड्या दिसत आहेत. यामुळे पावसाळ्यात पाणी साचल्याने खड्डा दिसत नाही आणि दुचाकीस्वारांचे जीव धोक्यात येत आहेत. अवजड वाहनेही याच रस्त्यावरून जात असल्याने भगदाड अधिक खोलवर जात आहे. अपघात टाळण्यासाठी आणि जनतेच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी मस्के कन्स्ट्रक्शनने तातडीने दर्जेदार दुरुस्ती करावी अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

-----------------------------------------

संपल्यामुळे ते तिघे मानेवाडीकडे परत जात असताना, सरकारी रुग्णालयाजवळ दुचाकीवरुन आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या हातातील पैशांची बॅग हिसकावली आणि पळ काढला. या घटनेनंतर, केज पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरु केला. तपासामध्ये, जसवंत उर्फ जश्यु शिवा पिटला (वय 18) आणि प्रसंगी उर्फ सन्नी एलिया चल्ला (वय 33) या दोघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. हे दोन्ही आरोपी आंध्र प्रदेशातील नेल्लोरे जिल्ह्यातील रहिवासी आहेत. सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांच्या पथकाने 10 सप्टेंबर रोजी परभणी येथील जिल्हा कारागृहातून न्यायालयाच्या आदेशाने त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी, पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे पुढील तपास करत आहेत. या आरोपींचा इतर गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे का, याचाही पोलीस तपास करत आहेत.

-----------------------------------------

दाखल झाले होते. जयराम याच्या सोबत त्याची 4 वर्षीय मुलगी अक्षरा बोराडे असल्याचे समोर आले होते. अक्षरा बोराडे ही नेमकी कोठे आहे. याचा शोध घेतला जात होता. पोलीस प्रशासनाने मुलगी आढळून आल्यास संपर्क करण्याचे आवाहन केले होते. मात्र दुर्दैवी घटना अशी की, या मुलीचा मृतदेह आज सकाळी बीड पासून जवळ असलेल्या रामगड शिवरातील एका लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. जयराम बोराडे यांने आधी मुलीला फाशी देवून नंतर इमामपूर रोडवर जावून आत्महत्या केली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मुलीला मारुन स्वतः जयराम बोराडे यांने आत्महत्या का केली? या प्रकरणाचा तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहे. निर्दयी बापाने चिमुकली मुलीचा खून करुन स्वतःचा जिवन संपवल्याने संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

-----------------------------------------

घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. गोविंद बर्गे यांनी पारगाव कला केंद्रातील नर्तिकेच्या घरासमोर स्वतःची कार पार्क करुन आत बसून कानशिलात गोळी झाडली. पोलीस घटनास्थळी पोहोचले तेव्हा कार लॉक (बंद) स्थितीत होती. आणि बॅटरी पूर्णपणे उतरलेली होती. आतमध्ये गोविंद बर्गे यांचा मृतदेह चालक सीटवर आढळून आला. प्राथमिक पोलीस निरीक्षणानुसार, गोळी उजव्या कानशिलातून शिरुन डाव्या बाजूने बाहेर पडल्याचे आढळले. नातेवाईकांच्या मते, गोविंद बर्गे साधारणपणे कुठेही जाताना कधीही साधी काठीही सोबत ठेवत नसत. त्यांच्या कडे कधीही पिस्तुल नव्हते, त्यामुळे त्यांना पिस्तुल कसे मिळाले यावर संशय व्यक्त केला जात आहे. या सर्व गोष्टी संशयास्पद असल्याने नातेवाईकांनी या घटनेत घातपात झाल्याचा दावा केला आहे. गोविंद बर्गे यांची पारगाव कला केंद्रातील 21 वर्षीय नर्तकी यांच्याशी ओळख दीड वर्षांपूर्वी झाली होती. कालांतराने दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. पूजाने गोविंदकडून पावणेदोन लाखांचा मोबाईल फोन, सोन्याचे दागिने आणि जमीनही घेतले होती. परंतु, काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये वाद सुरु झाला. तिने गेवराईतील बंगला आणि शेती आपल्या नावावर करण्याचा हट्ट धरला होता. मागणी न मानल्यास बलात्काराचा आरोप दाखल करण्याची धमकीही दिल्याचे नातेवाईकांकडून समजते. या प्रकाराने बर्गे प्रचंड मानसिक त्रासात आले.

संशयित नर्तिकेवर गुन्हा दाखल केला आहे. अटक करून न्यायालयात हजर केल्यावर तिला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. नातेवाईकांनी आरोप केला आहे की, नर्तिकेने गोविंद यांना आपल्या गावी बोलावून हत्या केली आहे.सध्या पोलीस या घटनेच्या सखोल चौकशीत व्यस्त आहेत. शिवाय नर्तिकाची सखोल चौकशी करत तिच्या जबाबांवरुन पुढील कारवाई निश्चित केली जाणार आहे. कार लॉक कशी झाली, पिस्तुल कुठून आले आणि प्रकरणामागील खरी कारणे याचा शोध पोलिस लवकरच लावतील, अशी अपेक्षा नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.

-----------------------------------------

मुलीच्या घशात चॉकलेट अडकून दुर्दैवी मृत्यू झाला. मुलीच्या घशात चॉकलेट अडकल्यानंतर या चिमुकलीचा मृतदेह कुशीत घेऊन नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालय गाठले. मात्र, उपचारापूर्वीच या घटनेत चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. बीड तालुक्यातील काटवटवाडी गावातील या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. आरोही आनंद खोड असे मृत मुलीचे नाव असून ती अवघ्या सात महिन्यांची होती. घरातच खेळत असताना खाली पडलेले चॉकलेट तिने तोंडांत टाकून गिळण्याचा प्रयत्न केला. मात्र, चॉकलेट तिच्या घशात अडकले आणि तिचा यात दुर्दैवी अंत झाला. कोवळ्या जीवासाठी चॉकलेट काळ बनून आलं अन् चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

-----------------------------------------

सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्रा आशिलता शिंदे यांच्या प्रास्ताविकानंतर प्रा डॉ राजकुमार यल्लावाड यांनी आपल्या वक्तव्यात जीवनात सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी परिस्थिती आडवी आली तरी कडवी झुंज देऊन तिच्यावर मात करावीच लागेल असे विचार मांडले. या प्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांनी ज्या देशांमध्ये शिक्षकांचा व शिक्षणाचा मान राखला जातो तोच देश सर्वांगीण विकास करु शकतो असे विचार मांडत शिक्षक दिनाच्या व 11वी वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैभवी स्वामी तर संध्या गित्ते ने आभार मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

-----------------------------------------

जगतकर हे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री भद्रे सर सहशिक्षक चिद्रेवार मॅडम सावरगावकर मॅडम व युवा कार्य प्रशिक्षक आकाश साळवे सर यांनी केले

-----------------------------------------

मिळालेले नाही तेव्हा माझी मा. साहेबाना विनंती की जर माझे उस वाहतुकिचे बिल येत्या 16-09-2025 पर्यंत मिळाले नाही तर दि 17-09-2025 मराठवाडा मुक्ती संग्राम दिनादिवशी आपल्या कायालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल व त्याची सर्वस्व जबाबदारी आपली राहिल असे म्हटलेले आहे. तरी सदरील वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना हा राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांचा असल्यामुळे या ऊस वाहतूक ट्रॅक्टर मालकाला वाहतूक बिलाचे पैसे मिळतात की यांच्या कारखान्याचे विरुद्ध सदरील वाहतूक ट्रॅक्टर चालक, मालक हा आमरण उपोषण करणार याकडे जिल्हा वाशियांचे लक्ष लागले आहे.

-----------------------------------------

एकवटतात, त्याप्रमाणे सर्व समाजघटकांनी आपले भेद विसरून भक्तीमार्गावर चालले पाहिजे. ईश्वरभक्तीमुळे मनात प्रेम, करुणा आणि क्षमा जागृत होते आणि त्यातूनच समाज सुदृढ होतो असे त्या म्हणाल्या

कथेच्यावेळी भाविकांची लक्षणीयगर्दी उसळली होती. महिलांचा सहभाग विशेष लक्षणीय ठरला. भजन-गायनात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिंतवादक जनक महाराज कदम पहाडी आवाजामध्ये श्रीकृष्णाचे गीत म्हणून उपस्थित सर्व त्यांच्या मनामध्ये आपण वृंदावन मध्ये आहोत असं वातावरण बनवलं पॅडवादक विनोद चव्हाण नांदेड जवळील उंचाडागाव व तबला साथ अशोक महाराज कराळे तर टाळ साथ श्रावणी कोकाटे-मृदंग साथ आनंदी कोकाटे उपस्थित श्रोत्यांना संगिताने निनाद घुमवत वातावरण भारावून टाकले. मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येक जण कथेत एकरुप झाला होता.गावात आलेल्या अनेक भक्तांनी सांगितले की, जनाई महाराजांची कथा ऐकतांना कधी डोळ्यातून अश्रू तर कधी चेहऱ्यावर हसू प्रत्येक श्रोत्यांच्या मनात प्रसन्नता दिसू लागली आणि भक्तीचा उत्साह जाणवतो. कार्यक्रमामुळे श्री हनुमान मंदिर परिसरात दिवसभर भक्तिरसाचे वातावरण निर्माण झाले.भागवत कथेच्या चौथ्या दिवसाबद्दल ग्रामस्थांमध्ये प्रचंड उत्सुकता असून, भाविकांची उपस्थिती अधिकाधिक वाढेल, असा विश्वास दत्तात्रय पंढरीनाथ मुंडे ज्ञानोबा पंढरीनाथ मुंडे तुकाराम पंढरीनाथ मुंडे अर्जुन पंढरीनाथ मुंडे व समस्त ग्रामस्थ संगम आयोजकांनी व्यक्त केला आहे.

-----------------------------------------

# अनिल अंबानी प्रकरण : 22,997 कोटींची बँकांची फसवणूक

उद्योगजगतामध्ये एकेकाळी आघाडीवर असलेले नाव म्हणजे अनिल अंबानी. रिलायन्स समूहाचे नेतृत्व करताना त्यांनी दूरसंचार, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली, परंतु गेल्या दशकभरात त्यांच्या कंपन्यांवर कर्जाचे ओझे प्रचंड वाढले. परिणामी व्यवसाय हळूहळू कोलमडू लागला आणि आज त्यांच्या कंपन्यांवर न्यायालयीन आणि तपास संस्थांच्या चौकशीचा परिणाम दिसून येत आहे. ताज्या घडामोडीनुसार ईडीने ₹2,929 कोटींच्या स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) फसवणुकीच्या प्रकरणी अनिल अंबानी, आरकॉम आणि इतरांविरुद्ध मनी लॉन्डरिंगचा गुन्हा नोंदवला आहे. याआधी यस बँकेकडून घेतलेल्या ₹3,000 कोटींच्या कर्जातील गैरवापर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर व इतर कंपन्यांद्वारे ₹17,000 कोटींची वळवणूक आणि रिलायन्स पॉवर व बिस्वाल ट्रेडलिंक प्रा. लि. यांच्याशी संबंधित ₹68.2 कोटींच्या बनावट बँक गॅरंटी प्रकरणही सुरु आहे. स्वतंत्र प्रकरणानुसार फसवणुकीची रक्कम अशी आहे: एसबीआय फसवणूक ₹2,929 कोटी, यस बँकेकडून गैरवापर ₹3,000 कोटी, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर व इतर कंपन्यांद्वारे वळवणूक ₹17,000 कोटी आणि बनावट बँक गॅरंटी ₹68.2 कोटी, तर यांचा एकत्रित परिणाम सुमारे ₹22,997.2 कोटी आहे. ही कारवाई ईडीकडून अंबानी समूहाविरुद्ध सुरु असलेल्या चौकशीतील चौथी मोठी प्रकरण ठरते आणि त्यामुळे अंबानींच्या अडचणी वाढल्या आहेत.

प्रकरणाची सुरुवात एसबीआयच्या तक्रारीतून झाली. मुंबई शाखेतील उपमहाव्यवस्थापक ज्योती कुमार यांनी ऑगस्ट 2024 मध्ये दाखल केलेल्या तक्रारीत फॉरेन्सिक ऑडिट अहवालाचा उल्लेख केला. अहवालानुसार आरकॉमला दिलेले कर्ज उद्दिष्टासाठी वापरले गेले नाही, उलट वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये पैशांची फेरफटका करण्यात आली. सेल्स इनव्हॉइस फायनान्सिंगचा गैरवापर, बनावट बिलांचे डिस्काउंटिंग, इंटर-कॉर्पोरेट डिपॉझिट्सद्वारे पैशांची वळवणूक आणि बनावट देणेकरी दाखवून नंतर बंद करणे अशा पद्धतींनी बँकेला मोठा तोटा सहन करावा लागला. 13 जून 2024 रोजी एसबीआयने आरकॉम आणि अनिल अंबानी यांना “फ्रॉड” म्हणून घोषित केले आणि 24 जूनला रिझर्व्ह बँकेला माहिती दिली. ईडीने त्यानंतर मनी लॉन्डरिंग ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल केला.

अंबानींच्या बाजूने वेगळा दृष्टिकोन मांडला जातो. प्रवक्त्यांनी सांगितले की, व्यवहारांची कालमर्यादा दहा वर्षांहून जुनी असून त्यावेळी अनिल अंबानी फक्त नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर होते. आरकॉम दिवाळखोरी प्रक्रियेतून चालत असल्याने आर्थिक व्यवहार कर्जदार समितीच्या देखरेखीखाली होते, आणि एसबीआयने इतर नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टरविरुद्ध कारवाई मागे घेतली, फक्त अंबानींवर कारवाई सुरु राहिली. या दृष्टीने, त्यांच्या प्रतिकूल बाजूला न्यायालयीन प्रक्रियेत युक्तिवाद करण्याची संधी आहे.

या प्रकरणामुळे सार्वजनिक बँकांतील जोखीम आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्समधील त्रुटी स्पष्ट होतात. एसबीआय ही देशातील सर्वात मोठी बँक असून लाखो ठेवीदारांचे पैसे हाताळते. अशा मोठ्या प्रमाणात कर्जाचा गैरवापर झाल्यामुळे बँकेच्या अंतर्गत यंत्रणा आणि जोखीम व्यवस्थापनावर प्रश्न निर्माण होतो. अंबानी समूहाच्या कंपन्यांवर वारंवार कर्ज घेऊन गैरव्यवहार करण्याचे आरोप पारदर्शकतेचा अभाव अधोरेखित करतात. हे प्रकरण कॉर्पोरेट जबाबदारी आणि आर्थिक व्यवहारांच्या तपासात पारदर्शकतेची आवश्यकता अधोरेखित करते.

अनिल अंबानी यांचा व्यवसाय प्रवास उतार-चढावांनी भरलेला आहे. दूरसंचार क्षेत्रात जिओच्या आगमनाने आरकॉमच्या अस्तित्वावर परिणाम झाला, प्रचंड कर्जामुळे कंपनी दिवाळखोरीत गेली, तर पायाभूत सुविधा व ऊर्जा क्षेत्रांत अपेक्षित यश मिळाले नाही. आज बहुतेक वेळ न्यायालयीन लढाया, बँकांचे दावे आणि तपास संस्थांच्या चौकशीत जातो. एनसीएलटी, सर्वोच्च न्यायालय आणि ईडी यांच्यामध्ये सुरु असलेल्या लढाईचा परिणाम केवळ अंबानींच्या कारकीर्दीपुरते मर्यादित राहणार नाही, तर बँकांच्या कर्जवाटप पद्धती, कॉर्पोरेट पारदर्शकता आणि आर्थिक गुन्ह्यांवरील कारवाई यावरही दूरगामी प्रभाव पडेल. मोठ्या उद्योगपतींनी केलेले आर्थिक निर्णय, जरी अनेक वर्षांपूर्वीचे असले तरी त्याचा हिशोब द्यावा लागतो; सार्वजनिक बँकेचे पैसे वाया घालवणे किंवा चुकीच्या पद्धतीने वळवणे कुणालाही परवडणारे नाही.

अनिल अंबानी प्रकरण हा केवळ एका उद्योगपतीच्या अडचणीपुरता मर्यादित नाही; तो सार्वजनिक बँकांची सुरक्षा, कॉर्पोरेट जबाबदारी आणि देशातील आर्थिक व्यवहारांवरील तपास याबाबतची गंभीर जाणीव निर्माण करतो. देशातील सामान्य नागरिक आणि ठेवीदारांचा विश्वास टिकवण्यासाठी बँकिंग क्षेत्राला अधिक पारदर्शक, जबाबदार आणि सतर्क राहावे लागेल. हे प्रकरण आर्थिक निर्णय घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी धडा आहे की, मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले तरी त्याचा हिशोब देणे अत्यावश्यक आहे आणि सार्वजनिक निधी सुरक्षित ठेवणे ही सर्वांच्या जबाबदारीत येते.

» डॉ. भारत कऱ्हाड



# भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गिते यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जोपासत साजरा





परळी वैजनाथ (वार्ताहर) भाजपा तालुका अध्यक्ष तथा वैधनाथ सहकारी साखर कारखाना गोपीनाथ गड पांगरी संचालक श्री राजेश भाऊ गित्ते यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. राजेश भाऊ गित्ते मित्र मंडळाच्या वतीने केंद्रीय प्राथमिक शाळा बेलंबा (नेहरु नगर )येथील विद्यार्थ्यांसाठी चटई वाटप करण्यात आले. तसेच विध्यार्थी यांना खाऊ वाटप करण्यात आला. पर्यावरण संतुलणासाठी शाळेच्या प्रांगणात वृक्षआरोपण करण्यात आले.

कार्यक्रमास गावातील नागरिक, शाळेचे सर्व शिक्षक, विध्यार्थी उपस्थित होते.कार्क्रम यशस्वी करण्यासाठी राजेश भाऊ गित्ते मित्र मंडळाचे अध्यक्ष केशव गित्ते, तुकाराम गित्ते, ओम गित्ते , वैजनाथ गित्ते दत्ता सूळ आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले

# महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड

## » डॉ.राजेश इंगोले यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड झाली आहे. डॉ.इंगोले यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अर्थात महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही नोंदणीकृत डॉक्टरांसाठीची सरकार नियुक्त समिती आहे. या समितीद्वारे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टर्सला अधिकृत मान्यता देणे तसेच दवाखाने व वैद्यकीय आस्थापना यांना मान्यता देणे किंवा नाही देणे याविषयी ही समिती कार्य करते. महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स व वैद्यकीय आस्थापनांवर महाराष्ट्र शासन या समितीद्वारे नियंत्रण ठेवते. वैद्यकीय उपचार करताना डॉक्टर व रुग्णालयाद्वारे योग्य प्रकारचा उपचार झाला आहे किंवा नाही, यामध्ये कुठे निष्काळजीपणा झाला आहे का..? याच्या पडताळणी करिता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची राज्य सरकार द्वारा नियुक्त ही समिती असते. संपूर्ण महाराष्ट्रातून पान 3 वर

# संपादक जितेंद्र सिरसाट यांना पितृशोक



बीड / प्रतिनिधी संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट यांचे बुधवार दि. 10 रोजी रात्री 9 वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय 81 वर्ष होते.

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील मूळ रहिवासी व सध्या संत नामदेवनगर भागात रहिवासी असलेले सायं. दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांना पिंपळनेर आणि बीड परिसरात 'दादा' पान 3 वर

# नरेगामध्ये होत असलेल्या गैरव्यवहारांची चौकशी लावण्यात यावी - अशोक येडे



बीड / प्रतिनिधी बीड जिल्ह्यामध्ये आम आदमी पार्टीच्या निरीक्षणात आले आहे की, बीड जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (नरेगा) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये (उदा. विहीर, वृक्षारोपण, फळबाग, तलाव, गाय गोठा, कांदा चाळ, रस्ते, नाले, ब्लॉक इत्यादी) मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी संबंधित नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत.

विशेषतः बीड तालुक्यातील वरवटी, चराटा, अंजनवती, लिंबागणेश तसेच वडवणी तालुक्यातील काही गावांमध्ये संबंधित कामांमध्ये लाभार्थ्यांना लाच न देता कोणतेही काम मिळत नाही अशी परिस्थिती आहे. शिवाय अनेक लाभार्थ्यांना काम झाले असतानाही त्यांच्या पेमेंटमध्ये अनावश्यक विलंब पान 3 वर

# दोन दिवसापूर्वी बापाने इमामपूर रोडवर घेतली होती फाशी

## 13 कोटींच्या रस्त्याला खड्डे नव्हे तर भगदाड!



लिंबागणेश / प्रतिनिधी

तत्कालीन ग्रामविकास मंत्री व विद्यमान पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री ग्रासडक योजनेंतर्गत सन 2015 ते 2021-22 या कालावधीत तब्बल 1933 किलोमीटर लांबीचे व 1986 कोटी रुपये किंमतीचे रस्ते ग्रामीण भागात दळणवळण सुधारण्यासाठी आणले होते. मात्र कंत्राटदार आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या संगनमताने या रस्त्यांची दुर्दशा झाली असून निधी गिळंकृत झाल्याचा आरोप होत आहे.

बीड तालुक्यातील पालवण - लिंबागणेश (प्राजिमा 31), आहेर धानोरा, वरवटी, भाळवणी, बेलेश्वर - लिंबागणेश हा सुमारे पान 3 वर

# लाखो रुपयांची रोकड लुटणाऱ्यांना केज पोलिसांनी घेतले ताब्यात





केज: केज येथे एका ऊसतोड मुकादमाच्या हातातील चार लाख रुपयांची पिशवी दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी हिसकावून पळ काढला होता. केज पोलिसांनी या घटनेचा तपास करत आंध्र प्रदेशातील दोन आरोपींना परभणी येथील कारागृहातून ताब्यात घेतले आहे.

29 जुलै रोजी उत्तरेश्वर धायगुडे (रा. मानेवाडी, ता. केज) हे त्यांचे मेहुणे आणि पुतण्यासोबत चार लाख रुपये घेऊन अंबाजोगाईहून केज येथे आले होते. त्यांना ही रक्कम बँकेत जमा करून नवीन ट्रॅक्टरच्या ट्रॉली खरेदीसाठी पाठवायची होती. बँकेची वेळ पान 3 वर

# निर्दयी बापाने मुलीला गळफास देवून मारले

## मुलीचा रामगड परिसरामध्ये आढळला मृतदेह



बीड :- बीडपासून काही अंतरावर असलेल्या इमामपूर रोड परिसरात एका व्यक्तीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना दोन दिवसापूर्वी घडली होती. सदरील हा व्यक्ती भाटसांगवी येथील होता. या व्यक्तीसोबत त्याची चार वर्षीय मुलगी होती. या मुलीचा बीड ग्रामीण पोलीस व नातेवाईक शोध घेत होते.सदरील मुलीचा मृतदेह आज सकाळी बीडपासून जवळच असलेल्या रामगड परिसरातील एका लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. निर्दय बापाने आधी मुलीला फाशी देवून नंतर त्याने फाशी घेतली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी ग्रामीण पोलीस दाखल झाली होती.

बीड शहरापासून काही अंतरावर असलेल्या इमामपूर रोड परिसरात जयराम बोराडे यांने 9 सप्टेंबर रोजी गळफास घेवून आत्महत्या केली होती. याची माहिती पोलीस प्रशासन आणि त्याच्या नातेवाइकांना झाल्यानंतर घटनास्थळी पोलीस व नातेवाईक पान 3 वर

# गेवराईतील माजी उपसरपंचाच्या मृत्यूप्रकरणात ट्विस्ट ; नातेवाईकांना वेगळीच शंका



गेवराई: बीडमधील गेवराईच्या लुखामसला गावचे माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांच्या मृत्यूने वेगळे वळण घेतले आहे. मृत गोविंद बाहेर जाताना कुठे साधी काठीही घेऊन जात नव्हता. मग,त्याच्या कारमध्ये पिस्तुल आलेच कुठून? असा सवाल नातेवाईकांनी केला आहे. त्यांचा घातपात झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. यामुळे या घटनेने नवा ट्विस्ट घेतला आहे. लुखामसला (ता.गेवराई जि.बीड) माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे हे बीडच्या पंचायत समितीत ऑपरेटर म्हणून काम करत असतानाच ते प्लाटिंगच्या व्यवसायात सक्रीय झाले. ऑपरेटर असताना गोविंद बर्गे हे साथीदाराबरोबर कला केंद्रात जाऊ लागले. त्यातच पारगाव (जि.धाराशिव) कला केंद्रातील एका 21 वर्षीय नर्तकीसोबत गोविंदची ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. नर्तिकेने लाखोंच्या महागड्या वस्तू गोविंद याच्याकडून घेतल्या. एवढ्यावर समाधान न झाल्याने गेवराईतील बंगला माझ्या नावावर करा. यावरुन गोविंद बर्गे व नर्तिका यांच्यात वादाची ठिणगी पडली. त्यामुळे नर्तिकेने आबोला धरल्याने मंगळवारी गोविंद बर्गे हे नैराश्यात होते. त्यातच त्यांच्या संशयास्पद मृत्यूने गेवराई तालुक्यात एकच खळबळ उडाली. बर्गे यांच्या नातेवाईकांनी आत्महत्येच्या पाठीमागे पान 3 वर

# अरे..रे चॉकलेट घशात अडकल्याने सात महिन्याच्या मुलीचा दुर्दैवी मृत्यू

बीड, :- जन्मजात मुलांची वयाच्या तीन वर्षांपर्यंत अत्यंत लहान-सहान बाबी लक्षात घेऊन काळजी घेतली जाते. दूध प्यायला किंवा काही पदार्थ खायला देतानाही विशेष लक्ष दिले जाते. मात्र, बीडमधून हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. एका 7 महिन्यांच्या चिमुकलीच्या घशाथ चॉकलेट अडकले अन् तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुःखद घटना घडली. त्यानंतर, चिमुकलीच्या कुटुंबीयांना आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा होता. विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी एक बातमी समोर आली होती. त्यामध्ये, एक लहानग्या मुलाने एलईडी बल्ब गिळल्याने त्याला त्रास होत होता. अखेर, डॉक्टरांनी तो एलईडी बल्ब काढून मुलाचा जीव वाचवला होता.

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी घटनांनी हादरुन सोडलेल्या बीड जिल्ह्यातील ही हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. येथील एका 7 महिन्यांच्या पान 3 वर

# ज्या देशात शिक्षक आणि शिक्षण यांचा सन्मान राखला जातो तोच देश विकसित होतो-प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे

## • लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 11वी विद्यार्थिनी स्वागत व शिक्षकदिन सोहळा उत्साहात संपन्न



परळी वैजनाथ दि.11 (प्रतिनिधी) देशाचे पूर्व उपराष्ट्रपति सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो . याचे औचित्य साधून येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील कनिष्ठ विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन, 11 वीच्या विद्यार्थिनींचा स्वागत सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला .

या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा डॉ राजकुमार यल्लावाड हे प्रमुख वक्ते, प्रा अशोक पवार यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम पान 3 वर

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मोफत गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न



परळी प्रतिनिधी-- परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नंबर 2 येथील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला. याबाबत सविस्तर माहिती अशी की दिनांक 11.9.2025 रोजी भीम नगर जगतकर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर 2 परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांना समग्र शिक्षण मोहीम महाराष्ट्र शासन तथा गटशिक्षण कार्यालय परळी वैजनाथ यांच्याकडून शालेय मोफत गणवेश वाटप अनुदानातून दुसरा टप्पा अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले असून या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थचे अध्यक्ष बालासाहेब जगतकर, आनंद जगतकर, शालेय शिक्षण समितीच्या उपाध्यक्ष सौ योगिताताई अवचारे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सूरज आण्णा पान 3 वर

# वैद्यनाथ साखर कारखान्याने ऊसाचे बिल न दिल्यामुळे ट्रॅक्टर मालकाचा आमरण उपोषणाचा इशारा.



वडवणी प्रतिनिधी.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना पांगरी तालुका परळी येथे सन 2020 ते 2021 मध्ये कारखान्याचे केलेल्या ऊस वाहतुकीचे बिल नामदार पंकजाताई मुंडे यांच्या कारखान्याने अद्यापही न दिल्यामुळे 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी वडवणी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा ट्रॅक्टर वाहतूक मालक सूर्यकांत देवराम भोरे राहणार वडवणी यांनी दिनांक 11 सप्टेंबर रोजी तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

वडवणी येथील सूर्यकांत देवराव भोरे यांनी तहसीलदार वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की 2020 ते 2021 चे उस गळीत हंगामात ट्रॅक्टर क्रमांक MH 21- AH 1282 या ट्रैक्टरने वैद्यनाथ सहकारी साखर कारखाण लि.पांगरी ता परळी वै येथे ट्रैक्टरने ऊस वाहतूक केलेली असून मला आज पर्यत माझे उस वाहतुकीचे बिल पान 3 वर

# समाजातील ऐक्य हेच खरी शक्ती" – ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे

## भागवत कथेच्या चौथ्या दिवसात ऐक्य व सद्भावनेचा संदेश




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) संगम (ता. परळी) परळी जवळील संगम येथे स्वर्गीय चिरंजीव अक्षय तुकाराम मुंडे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ श्रीमद् भागवतकथाचे आयोजन करण्यात आले आज चौथा दिवस कथेचा संपन्न झाला कथेमध्ये श्रीकृष्ण भगवान यांचा जन्म झाला कथेमध्ये जिवंत देखावा करण्यात आला मनमोहक कृष्णाच्या रूपाने संगमकर भारावून गेले

सुरु असलेल्या श्रीमद्भागवत कथेच्या चौथ्या दिवसाचा कार्यक्रम आज गुरुवार दिमाखात पार पडला. या प्रसंगी प्रमुख भागवताचार्य ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे (संगमकर) यांनी आपल्या ओजस्वी वाणीतील कथेच्या माध्यमातून समाजातील ऐक्य, सद्भावना आणि परस्पर स्नेहाचे महत्व पटवून दिले.

आपल्या कथेत मध्ये जनाई महाराज म्हणाल्या – "समाजातील ऐक्य हीच खरी शक्ती आहे. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्या समुद्रात पान 3 वर

# लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाने एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्यासाठी जिल्हा अधिकाऱ्यांना दिले निवेदन



अहमदपूर प्रतिनिधी:- महाराष्ट्र शासनाने हैदराबाद गॅझेट लागू केल्याने तेलंगणा व आंध्र प्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करावे – समस्त बंजारा समाज लातूर जिल्हा.

महाराष्ट्र शासनाने हैदराबाद गॅझेट लागू केल्याने तेलंगणा व आंध्र प्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करावी यासंदर्भामध्ये समस्त बंजारा समाज लातूर जिल्ह्याच्या वतीने लातूर जिल्हा अधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले त्यावेळी लातूर जिल्ह्यातील सर्व समाज बांधव दिव्य निवेदन रॅली काढून हजारोंच्या संख्येने निवेदन देण्यात आले.